**C**

**SL. No. : N**

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 64 ]
Total No. of Questions : 64 ]

**CCE PR**
**REVISED**

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 8
[ Total No. of Printed Pages : 8

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M**

**Code No. : 08-M**

# ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

# Subject : First Language — MARATHI

**( ಹೊಸ ಪಠ್ಯಕ್ರಮ / New Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Private Repeater )**

ದಿನಾಂಕ : 22. 06. 2018 ]
[ Date : 22. 06. 2018

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 09-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 12-45 ರವರೆಗೆ ]
[ Time : 09-30 A.M. to 12-45 P.M.

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 125 ]
[ Max. Marks : 125

**विद्यार्थ्यांना सामान्य सुचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तूनिष्ठ प्रकारचे 64 प्रश्न आहेत.

2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परोक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3. बहूपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नासाठी दिलेल्या सुचनांचे पालन करा.

4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठो 15 मिनिटेही दिलेली आहेत.

येथून कापा.

**TEAR HERE TO OPEN THE QUESTION PAPER**
**प्रश्न पत्रिका येथून कापून उघडा.**

**Tear here**

## विभाग-A

### ( गद्य पद्यांशावर आधारित )

I. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : $16 \times 1 = 16$

1. चि. वि. जोशींच्या मानसपुत्रांची नांवे लिहा.
2. काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांना काय वाटले ?
3. बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ?
4. 'मेळघाटचे शिल्पकार' पाठाचे मूल्य कोणते ?
5. शाळेला जाऊन मुलांनी किती मार्क मिळविले ?
6. टपरीपाशी उभ्या असलेल्या तरुणाच्या हातात कोणते पाकीट होते ?
7. सुषमा देशपांडे यानी बचत गटाच्या संकल्पनेसाठी कोणते मासिक चालविले आहे ?
8. सावित्रीबाईंचा जन्म कोणत्या गावी झाला ?
9. भरदुपारी कुणाची रांग लागते ?
10. पायांना त्या काय बांधून वाट तुडवितात ?
11. भुकेलेली पोरे कशी धावतात ?
12. 'मनाचे पिंजरे' हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे ?
13. शिबिरं कोणासाठी घ्यावीत असे डॉक्टरांना वाटते ?
14. विरहिणी म्हणजे काय ?
15. नरेंद्र कोणाच्या दरबारात कवी होते ?
16. स्त्री रान का धुंडाळते ?

II. खालील प्रश्नांची उत्तरे **तीन-चार** वाक्यात लिहा : 13 × 2 = 26

17. 'अनंतशक्तिः परमेश्वरू' या कथेचे तात्पर्य लिहा.

18. दीर्घोद्योग व कष्ट करण्याने यश प्राप्त होते म्हणजे काय ?

19. गंगुबाईना कोण कोणते पुरस्कार आणि उपाधीनी सन्मानित करण्यात आले ?

20. संत ज्ञानेश्वरांचा परिचय लिहा.

21. 'विडंबन' म्हणजे काय ? पाहुणे ही कविता कोणत्या कवितेचे विडंबन आहे ?

22. "गाई पांगता जीवाची रागामुळं व्हई आग." संदर्भासह स्पष्टीकरण करा.

23. "मजला तोफेच्या तोंडी बांधून माझे डोके तरी किल्ल्यात पाडावे." संदर्भासह अर्थ स्पष्टीकरण करा.

24. विद्या कशाप्रमाणे आहे ? माणूस विद्येचा पुजारी केव्हा होईल ?

25. रा. रं. बोराडे यांचा परिचय लिहा.

26. फुल्यांना कशाचा झटका आला ? झटका आल्यावरही त्यांनी कोणते पुस्तक लिहले ?

27. पाहुण्यांच्या वर्तनाने आई कंटाळून का गेली ?

28. तिच्या संसाराला वणवा का म्हटले आहे ?

29. विठ्ठलाला कोणती विनवणी केली आहे ?

III. खालील प्रश्नांची उत्तरे **पाच-सहा** वाक्यात लिहा : 10 × 3 = 30

30. लढाईतोल जखमी लोकांसाठी व इतरांसाठी श्रीमंतानी काय केले ?

31. ''कोपऱ्यातील छत्री घेऊ नका'' असे दकानदार लेखकाना का म्हणाला ?

32. दोघे भाऊ का भांडत असत ? वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ?

33. अण्णा वारल्यानंतर आईचे जगच खलास झाले होते म्हणजे काय ?

34. रुक्मिणीच्या गुरुचे नाव काय ? श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने काय काय प्रयत्न केले आहेत ?

35. ''जरा तरी समज धरी अंतरी.'' असे कवी का म्हणत आहे ?

36. धरण बांधणाऱ्या स्त्रीची व्यथा तुमच्या शब्दात लिहा.

37. तारे, सुधांशू, शुक्र यांनी पथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोणते प्रयत्न केले आहेत ?

38. बेळगाव काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

39. गराखी कृष्ण झाला नाही असे कवी का म्हणतो ?

IV. खालील प्रश्नांची उत्तरे **आठ-दहा** वाक्यात लिहा : 5 × 4 = 20

40. 'मदर्स युनियन' संस्थेची माहिती लिहा.

41. लेखकाच्या अंगणात कोणकोणती झाडे आहेत ? चाफ्याच्या झाडाला लेखक 'बडी माँ' का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ?

42. कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय याचे दाखले का दिले आहेत ? ते स्पष्ट करा.

43. 'सत्कार' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

44. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा —

जातीभाव विसरूनिया ..............................................

..................................................................

..................................................................

.......................................................... भीती बावरी.

## विभाग-B

### ( व्याकरणावर आधारित )

V. खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 10 × 1 = 10

45. "सदाचार" ही संधी अशी सोडवितात

(अ) सदा + चार (ब) सद् + आचार

(क) सत् + आचार (ड) स + दाचार.

46. 'त, ई, आ' हे कोणत्या विभक्तीचे प्रत्यय आहेत ?

(अ) प्रथमा (ब) द्वितीया

(क) पंचमी (ड) सप्तमी.

47. 'मनस्वी गाणे गाते.' या वाक्यात प्रयोग कोणता आहे ?

(अ) कर्मणी (ब) भावे

(क) कर्तरी (ड) यापैकी नाही.

48. 'वरदने चित्र काढले.' या वाक्यात कोणता काळ आहे ?

(अ) भविष्य काळ (ब) भूत काळ

(क) वर्तमान काळ (ड) पूर्ण भूतकाळ.

49. इकडे आड तिकडे ........................ ही म्हण पूर्ण करण्यासाठी हा शब्द वापरावा.

(अ) झाड (ब) नदी

(क) विहीर (ड) सरोवर.

50. 'वा! किती सुंदर अक्षर आहे.' हे या प्रकारचे वाक्य आहे

(अ) आज्ञार्थी (ब) प्रश्नार्थी

(क) उद्गारवाचक (ड) केवलवाक्य.

51. 'अनंतशक्ती' हा या प्रकारचा समास आहे

(अ) कर्मधारय (ब) अव्ययीभाव

(क) बहुव्रीही (ड) द्विगू.

52. 'रणांगणावर आलेले मरण' याला एक शब्द

(अ) आहुती (ब) शहीद

(क) मृत्यू (ड) वीरमरण.

53. 'सिद्धी <u>भरभर</u> चालते' या वाक्यातील 'भरभर' या शब्दाची जात ही आहे

(अ) क्रियापद (ब) विशेषण

(क) क्रिया विशेषण (ड) नाम.

54. 'सांडणी' याचे पुल्लींग रूप हे आहे

(अ) सांडणी (ब) उंट

(क) कुत्रा (ड) मांडणे.

VI. खालील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा : $4 \times 1 = 4$

55. ज्ञान : अज्ञान : : प्रेम : ..............

56. ! : उद्गारवाचक : : ? : ..............

57. तोय : जल : : सदन : ..............

58. बटाटा : पोर्तुगीज : : अडकित्ता : ..............

VII. सूचनेप्रमाणे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$

59. 'हटा तटाने पटा रंगवुनि जटा धरिशी का शिरी.'

अलंकार ओळखून लक्षण लिहा.

60. 'युगामागुनी चालली र युगे ही करावी किती भास्करा वंचना.'

या ओळीचे गण पाडून वृत्त ओळखा.

61. पुढील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(i) कैलासवासी होणे

(ii) शिळ्या कढीला ऊत येणे.

## विभाग-C
## ( लेखन व रचनेवर आधारित )

VIII. 62. खालीलपैको **एका** कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3

(i) मरावे परी किर्तीरूपे उरावे.

(ii) बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.

IX. 63. आरोग्याचे महत्व सांगणारे पत्र तुमच्या भावाला / बहिणीला लिहा. 1 × 5 = 5

**किंवा**

तुम्ही दहावी पास झाला आहात. पुढील शिक्षणासाठी शाळा सोडल्याचा दाखला मागण्यासाठी तुमच्या मुख्याध्यापकांना अर्ज लिहा.

X. 64. खालीलपैकी **एका** विषयावर **15** ते **20** ओळीत निबंध लिहा : 1 × 5 = 5

(i) इटरनेट काळाची गरज

(ii) भारतातील शेतकऱ्याची समस्या

(iii) राष्ट्रीय सण.